MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



बीड । प्रतिनिधी
समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ओबीसी समाजाचे नेते, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करून विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करताना समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ड. सुभाष राऊत, समता परिषदेचे बीड शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत आदी दिसत आहेत.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -२८ | मंगळवार दि.१५ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -28 | TUESDAY DT.15 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभचा दणका; जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर..!

## गेवराई तहसीलमध्ये मंजूर झालेल्या संजयगांधी व श्रावणबाळ योजनेच्या यादीची होणार चौकशी

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई : तहसीलमध्ये मागील काही दिवसांपूर्वी संजयगांधी व श्रावणबाळ योजनेची बैठक झाली होती आणि यामध्ये १२ हजार लाभार्थ्यांची मंजूर यादी समितीकडून प्रसिद्ध करण्यात आली होती. ती यादी पाहून तालुका दंग झाला होता कारण त्या यादीमध्ये वयोवृद्ध डावलून ज्यांना लाभ देता येत नाही असे से लाभार्थ्यांचे नावे आहेत. ती यादी सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ च्या हाती लागताच त्याप्रकरणी दि.१३ ऑक्टोंबर रोजी बातमी प्रकाशित करून जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार लगेच जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. याप्रकरणाची सत्यता पडताळून अहवाल सादर करण्याचे आदेश गेवराई चे तहसीलदार यांना दिले आहे.**

यामुळे गेवराई तालुक्यातील वयोवृद्ध आणि दिव्यांगांना न्याय मिळणार आहे. शासनाकडून संजय गांधी तसेच श्रावणबाळ अशा योजनांमधून निराधारांना लाभ दिला जातो. परंतु अशा खऱ्या लाभार्थ्यांना लाभ न देता गेवराई तहसील मध्ये मनमानी कारभार करून तसेच शासनाची फसवणूक करून बोगस लाभार्थींची निवड करून यादी प्रसिद्धी करण्यात आली आहे. यामुळे खरे लाभार्थी वंचित राहिले असून नाराजी व्यक्त केली आहे. संजयगांधी व श्रावणबाळ योजनेअंतर्गत वयोवृद्ध आणि दिव्यांग अपेक्षित असताना यामध्ये बोगस लाभार्थींची निवड केल्याने अनेक सुज्ञ नागरिकांनी सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभला खंत व्यक्त केली आहे. लगेच हे प्रकरण गंभीर घेऊन गोरगरीब वयोवृद्ध नागरिकांना न्यायासाठी दैनिक महाराष्ट्र आरंभ निर्भीड लेखणीतून आवाज उठवून न्याय दिला आहे. हे समजताच अपात्र ठरलेले गोरगरीब लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केली आहे. बातमीची दखल घेऊन जिल्हा प्रशासन क्शन मोडवर आले आहे. याप्रकरणाची सखोलपणे प्राप्त अर्जांची छाननी करूनच लाभ देण्यात यावा तसेच असे बोगस नावे लावून शासनाची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी गेवराई तालुक्यातील गोरगरीब वयोवृद्ध लाभार्थ्यांनी आणि सर्व सामान्य जनतेनी केली आहे. गेवराई तहसील मध्ये मागील काही दिवसांपूर्वी संजयगांधी व श्रावणबाळ योजनेची बैठक झाली होती आणि या बैठकीत झालेल्या लाभार्थ्यांची निवड ती अत्यंत चुकीच्या पद्धतीने झाली होती. त्यामध्ये पात्र लाभार्थ्यांचे अर्ज जमा केलेले असताना त्यांना वंचित ठेवण्याचे काम केले आहे. अनेक खरे लाभार्थी या योजनेपासून वंचित ठेवून बोगसगिरी करून बहुतांश अपात्र असणारे अर्ज मंजूर करून करण्यात आले आहे. यामुळे ही मंजूर करण्यात आलेली यादी तात्पुरत्या स्वरुपात प्रलंबित करून योग्य ती चौकशी करण्यात यावी यासाठी दैनिक महाराष्ट्र आरंभ ने आवाज उठवला होता. आणि त्या दणक्याने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी चौकशीचे आदेश गेवराई तहसीलदार यांनी दिले आहे. यामुळे खरे वयोवृद्ध लाभार्थ्यांनी आता न्याय नक्कीच भेटणार आहे. तसेच तालुक्यातील बोगस नावे मंजूर केलेले सर्व अर्जांची छाननी करूनच मंजूरी देण्यात यावी आणि खरे अपात्र ठरलेले लाभार्थ्यांना न्याय द्यावा अशी मागणी होत आहे.

### गेवराई तालुक्यातील संजयगांधी व श्रावणबाळ योजनेच्या खरे लाभार्थ्यांना मिळणार न्याय बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी काढले चौकशीचे पत्र



सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
मुख्य संपादक दीपक थोरात - मो.9860898564


**गेवराईत संजय गांधी व श्रावणबाळ योजनेत पुन्हा बोगस लाभार्थी; खरे लाभार्थ्यांना डावलले..!**

- गेवराई तहसीलमध्ये १२ हजार संजयगांधी व श्रावणबाळ लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर
- मंजूर यादीत तरूण लाभार्थ्यांची संख्या असून, खरे लाभार्थी आणि निराधार अद्याप वंचित?
- तहसील प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी प्राप्त अर्जांची छाननी करूनच मंजूर दिली आहे का?
- समितीचा आणि तहसील कार्यालयाचा सावळा गोंधळ आणि बोगस कारभार चव्हाट्यावर?
- मंजूर यादी तात्पुरत्या स्वरुपात प्रलंबित करून चौकशी करा मग सत्य बाहेर येईल?
- मंजूर झालेल्या सर्व लाभार्थ्यांची चौकशी करूनच लाभ द्यावा; सामान्य नागरिकांची मागणी
- मंजूर यादीतील सर्व लाभार्थ्यांची चौकशी करून त्यांना आदेश वितरित करण्याची सर्व सामान्यांची मागणी
- जिल्हा प्रशासनाने हे प्रकरण गंभीर घेऊन दोषींवर कारवाई करणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार?

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय गेवराई जि.बीड

गेवराई । प्रतिनिधी
केंद्र व राज्य शासनाने गोर गरिबांना, दिव्यांगाना व वृद्धांना मदतीचा हात मिळावा म्हणून संजय गांधी निराधार योजनेंतर्गत 'श्रावण बाळ योजना' सुरू केली. परंतु या योजनेत ६५ वर्षे वय पूर्ण करणाऱ्या वृद्धांचा समावेश करण्याचे शासन निर्णय असून देखील मात्र गेवराई तालुक्यातील वयोमर्यादा पूर्ण न करणाऱ्यांची नावे दलालामार्फत मंजूर यादीत समावेश करण्यात आल्याने खरे लाभार्थ्यांकडून नाराजी व्यक्त होत आहे.
असे खरे लाभार्थ्यांना डावलून पात्र नसलेल्यांना पात्र ठरवल्याने खरे लाभार्थ्यांवर अन्याय होत असल्याची चर्चा आहे. वयोवृद्ध, विधवा, परित्यक्त्या, निराधार यांना आधार मिळावा यासाठी शासनाकडून महिन्याला मानधन रूपात पगार करण्यात येते. परंतु ह्या योजना खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. कारण अधिकारी आणि लाभार्थी यांच्यामध्ये दलालांनी घुसखोरी केली असून, आर्थिक तडजोड करून ज्यांचे वय बसत नाही ज्यांना लाभ देता येत नाही. अशा लोकांना लाभार्थी बनवून शासनाची फसवणूक करण्यात येत असून याला निवड समिती आणि तहसील प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी जबाबदार आहेत. अशी चर्चा सदरील मंजूर यादी बघितल्यानंतर सामान्य जनतेतून आणि अपात्र लाभार्थ्यांतून होत आहे. गेवराई तहसील मध्ये तालुक्यातील निवड संजय गांधी, श्रावणबाळ योजनेअंतर्गत करून यादी प्रसिद्धी करण्यात आली असून, यामध्ये ज्यांना लाभ मिळाला पाहिजे असे लाभार्थी वंचित ठेवून, गावागावात आपल्या वतीचे बोगस लाभार्थी दाखवून शासनाची फसवणूक केली असल्याने यामध्ये अधिकारी सहभागी आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला जात असून, मंजूर झालेल्या सर्व लाभार्थ्यांची पाहणी आणि चौकशी करूनच लाभ द्यावा अशी मागणी होत आहे.
तसेच जिल्हा प्रशासनाने हे प्रकरण गंभीर घेऊन दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सर्व सामान्यांकडून होत आहे. गेवराई तहसील मध्ये तालुक्यातील लाभार्थ्यांची निवड संजय गांधी, श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांची मंजुरी झाली असून यामध्ये खरे लाभार्थी वंचित राहिले आहेत. तर ज्यांना लाभ देता येत नाही ज्यांचं वय पूर्ण नाही, ज्यांची नावे या योजनेत बसूच शकत नाही. अशा लोकांचे नावे हे यादीत आले आल्याने हा सावळा गोंधळ आणि मनमानी कारभार चव्हाट्यावर येत आहे. शासनाकडून वयोवृद्ध, विधवा, दिव्यांग, ज्यांना एक मुलगा आहे असे आई-वडील यांना श्रावणबाळ योजनेअंतर्गत लाभ देण्यात येतो, परंतु अनेकांना कागदपत्रे जमा करताना त्रास होतो यामुळे त्यांच्याकडून तहसील या ठिकाणी कागदपत्रे जात नाहीत असे लोक या योजनेपासून वंचित राहतात. आणि याचाच फायदा एजंट लोक घेत असून दोन ते तीन हजार रुपये घेऊन पगार लावण्याचे काम तालुक्यातील अनेक बहाद्दर करत आहेत. यामध्ये अधिकारी यांना हाताशी धरून अनेक जण बोगस लाभार्थी यांना लाभ मिळवून देत असल्याने खरे लाभार्थी वंचित राहिलेले आहेत. यावर जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्यामार्फत समिती नेमणूक करण्यात येते, परंतु ही समिती मर्जीतल्या लोकांना प्राधान्य देत असल्याने यामध्ये राजकारण येते. सध्या गेवराई तहसील मध्ये जवळपास १२ हजार संजयगांधी व श्रावणबाळ लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर झाले आहेत. परंतु यांच्या फाईल अधिकारी कर्मचारी यांनी तपासले आहेत का? समितीने जे नावे मंजूर केली ते नावे शासनाच्या नियम आणि अतीच्या अधीन राहून मंजूर केलेत का? शासनाचे निकश डोळ्यासमोर ठेवून तहसील कार्यालयात प्राप्त अर्जांची छाननी केली आहे का? या सर्व बाबी तपासणी गरजेचे असताना देखील असे काहीच न करता निवडणुका डोळ्यासमोर ठेवून यादी मंजूर करण्याचा धडाका संजय गांधी आणि श्रावणबाळ समितीने लावला आहे. यामध्ये तहसील प्रशासनातील अधिकारी यांनी आलेले अर्ज आणि फाईल तपासणी केली की नाही असा प्रश्न उपस्थित होत असून, मंजूर यादी मधील सर्वांची चौकशी करूनच त्यांना आदेश वितरित करावे

13 Oct 2024 - Page 4 | epaper.maharashtraaarambh.com
Powered by softisky | 9764331134



जिल्हाधिकारी कार्यालय,बीड
(संजय गांधी विभाग)
दुरध्वनी: 02442(222604) Email ID- rdc.beed2@gmail.com

क्र.2024/ संगांयो /तक्रार/ बातमी -दैनिक आरंभ/ लोकाशा /कावि- दि.14.10.2024

प्रति,
तहसीलदार गेवराई ,
जि.बीड

**विषय:-गेवराई तहसीलमध्ये संजयगांधी व श्रावणबाळ योजनेअंतर्गत खरे लाभार्थ्यांना डावलुन बोगस लाभार्थीचे अर्ज मंजर केले बाबत.**

संदर्भ:-1.श्री.नवनाथ आडे ,दिव्यांग सदस्य तथा पत्रकार यांचा मेल दि.13.10.2024
2.दैनिक वर्तमानपत्र आरंभ व लोकाशा मधील ठळक बातमी दि.12.10.2024

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय मेल या कार्यालयास प्राप्त आहे.ज्यात मागील तीन ते चार दिवसांपूर्वी गेवराई तहसील मध्ये संजयगांधी व श्रावणबाळ योजनेअंतर्गत जवळपास 12 हजार लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले असून,त्यामध्ये बहुतांश लाभार्थी बोगस आहेत. आणि अशा बोगसगिरीमुळे खरे लाभार्थी या योजनेपासून वंचित आहेत. तरीही आपणास विनंती आहे की, सदरील प्रकरण आपण गंभीर स्वरूपांत घेऊन तात्काळ लाभार्थ्यांची चोकाशी करून लाभ देण्यात यावा..! अशी विनंती केलेली आहे.

करिता आपणास कळविण्यात येते की, दि.12.10.2024 रोजी विषयांकित प्रकरणी दैनिक आरंभ व लोकाशा या वृत्तपत्रातील प्रसिध्द बातमीच्या अनुषंगाने प्रकरणाची सत्यता पडताळुन आपल्या स्वयस्पंष्ट अभिप्रायासह अहवाल या कार्यालयास सादर करावा .

**सोबत :- वृत्तपत्रातील नमुद बातमी ची छायाप्रत**

(रामदास बोठे)
नायब तहसीलदार (सा.)
जिल्हाधिकारी कार्यालय बीड

प्रतिलीपी:- श्री.नवनाथ आडे ,दिव्यांग सदस्य तथा पत्रकार यांना माहीतीस्तव सादर.

(रामदास बोठे)
नायब तहसीलदार (सा.)
जिल्हाधिकारी कार्यालय बीड

## बीड मतदारसंघात डॉ.योगेश क्षीरसागरांच्या हस्ते ६ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन



**बीड (प्रतिनिधी)**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पाठपुरावा करून मतदारसंघात कोट्यवधींचा निधी खेचून आणला आहे. बीड मतदारसंघाचा ५ वर्षाचा विकासाचा बॅकलॉग भरून काढत डॉ.क्षीरसागर यांनी चेहरा-मोहरा बदलण्याचा प्रयत्न केला आहे. मागील आठ दिवसात ६ कोटींच्या विकासकामांना प्रत्यक्षात सुरुवात झाली असल्याने ठिकठिकाणच्या नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.**

प्रगतीपथावर असलेल्या विकासकामांमध्ये पालवण चौक परिसरात योगभूषण कॉलनी, शहेंशावली दर्ग्याच्या मागील बाजूस, प्रभाग क्रमांक २ मधील बारादरी, शिंदे यांचा मला, जुने सावरकर कॉलेज परिसर येथील अंतर्गत गल्ली, पंचशील नगर भागातील त्रिरत्न बौद्ध विहार परिसर, नवीन सरस्वती विद्यालय परिसरातील राधाकिसन नगर, प्रभाग क्र.१३ मध्ये विविध सिमेंट रस्ते व नाली बांधकाम, अंतर्गत ९ रस्ते, हायमास्ट सोलार दिवे बसविणे, हनुमान मंदिर येथे सामाजिक सभागृहाचे बांधकाम, सिंहगड कॉलनी नं.२ व जटाशंकर गल्ली, जालना रोड परिसरातील सागर हॉस्पिटल गल्ली, फुलाई नगर, कॅनॉल रोड परिसर, अंबिका चौक परिसर, अंकुश नगर परिसरातील नंदनवन कॉलनी, ग्रामीण पोलीस स्टेशन परिसर, कबाड गल्ली, पिंगळे गल्ली येथील गवळी समाज मंदिर, संत सावतामाळी सभागृह येथे कंपाउंड वॉल, इमामपूर रोड येथे मांग गारुडी समाजाचे सभागृह, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या समोर छत बांधकाम, बंकटस्वामी महाविद्यालय परिसरात त्यागी निवास (जैन मंदिर) येथे कंपाउंड वॉल, चांदणी चौक परिसरात ढोर समाजाचे सामाजिक सभागृह, पेठ बीड भागातील लोणारपुरा परिसरात लोणार समाजाचे सामाजिक सभागृह, नाळवंडी नाका परिसरातील शास्त्रीनगर अंतर्गत सिमेंट रस्ता, गांधी नगर परिसरातील वडार समाज वस्ती, मोमीनपुरा भागातील कुरेशी मोहल्ला, धोंडीपुरा भागातील केंडेवाडा गल्लीत पेव्हर ब्लॉक, रस्ता व नाली, क्रांती नगर भागातील छत्रपती कॉलनी, धानोरा रोड भागातील महात्मा फुले नगर, बापूजी नगर या भागातील रस्ते व नाली, पेव्हर ब्लॉकसह सभागृह, बांधकामाचा समावेश आहे. तसेच, ग्रामीण भागात ५ कोटींचा निधी आहे. या सर्व कोट्यवधींच्या कामांच्या भूमिपूजन प्रसंगी ठिकठिकाणी डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, माजी नगरसेवक, सरपंच आदींची उपस्थिती होती.

ग्रामीण, शहरी भागात बरोबरीने निधी दिला -डॉ.योगेश क्षीरसागर

उपमख्यमंत्री अजितदादा, पालकमंत्री धनुभाऊ यांच्या माध्यमातून शासन, प्रशासनाकडे पाठपुरावा करून वर्षभरात बीड विधानसभा मतदारसंघात ग्रामीण, शहरी भागात आपण बरोबरीने निधी दिला. नुकतेच आठ दिवसात ७ कोटींच्या कामांना सुरुवात केली आहे. नागरिकांना अधिकाधिक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असतो. कामे दर्जेदार करून घेण्यासाठी माझ्यासह यंत्रणेचे लक्ष असते, असे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

## उर्दू घर उभारुन बाबा सिद्दीकींचे नाव देणार : डॉ.योगेश क्षीरसागर

### बीडमध्ये जुनी ईदगाह मैदानावर १ कोटींच्या कामाचे उद्घाटन; मुलींचे वसतिगृह उभारणार

**बीड (प्रतिनिधी)**

**प्रलंबित असलेला उर्दू घर व मुस्लिम मुलींच्या वसतिगृहाचा प्रश्न येत्या वर्षभरात सोडविला जाईल. त्यासाठी शासन दरबारी सतत पाठपुरावा सुरू आहे. उर्दू घर उभारून त्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते बाबा सिद्दीकी यांचे नाव देण्याचा ठराव मी मुस्लिम बांधवांसमोर मांडला. या ठरावास सर्वांनी एकमुखाने पाठिंबा देत होकार दिला आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.**

बीड शहरातील नाळवंडी नाका भागातील जुनी ईदगाह मैदानाचे सुशोभीकरण, बांधकाम यासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून महाराष्ट्र सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) या योजनेतून १ कोटींचा निधी मंजूर केला होता. या कामाचे भूमिपूजन सोमवारी (दि.१४) डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. हे केवळ बोलण्यापुरते मर्यादित न ठेवता अजितदादा व धनुभाऊ यांच्या माध्यमातून कृतीतून सिद्ध करून दाखविले आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासह अल्पसंख्यांकाच्या विविध योजनांसाठी कोट्यवधींची तरतूद महायुती सरकारने केली आहे. त्यामुळे समाजाचे खरे हितचिंतक कोण आहेत, हे ओळखण्याची गरज आहे. उर्दू घरासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. येत्या वर्षभरात उर्दू घर उभारून त्याला दिवंगत नेते बाबा सिद्दीकी यांचे नाव दिले जाईल. तसेच, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मुस्लिम मुलींच्या वसतिगृहाचाही प्रश्न सोडविला जाईल, अशी ग्वाही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. याप्रसंगी मुफ्ती मोहीयोद्दीन साहाब, मौलाना मुख्तार साहब, मौलाना सद्दर, हाफिज नदीर, हाफेज नजमुद्दीन साहाब यांच्यासह माजी नगरसेवक, मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित नागरिक व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### ख्रिश्चन स्मशानभूमीसाठी दिला ५० लाखांचा निधी

महाराष्ट्र अल्पसंख्यांक विभागाच्या योजनेतून बीड शहरातील अंकुश नगर भागातील ईडन गार्डन (ख्रिश्चन स्मशानभूमी) येथे ५० लक्ष रुपयांचा निधी दिला असून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ख्रिश्चन धर्मगुरू चार्ल्स सोनवणे, नगरसेवक भीमराव वाघचौरे, गणेश वाघमारे, मरियन रेड्डी, आशिष शिंदे , किशोर पाटील, मथ्यू जोसेफ, पास्टर संजय गायकवाड, पा.अमृत सोनावणे, गजानन जवकर, बिपिन देशमुख, सुशांत सत्राळकर, प्रेमविजय भालतिलक आदी उपस्थित होते.

### नाळवंडीत ईदगाह मैदानाचे सुशोभीकरण, बांधकामासाठी २७.५० लाखांचा निधी

बीड तालुक्यातील नाळवंडी येथे महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागांतर्गत मुस्लिम बांधवांसाठी ईदगाह परिसर येथे २७.५० लाख रुपयांच्या निधीतून सुशोभीकरण व बांधकाम होणार आहे. या कामाचे भूमिपूजन डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी जि.प.सदस्य, सरपंच ड.राजेंद्र राऊत, उपसरपंच बंडू म्हेत्रे, ग्रा.पं.सदस्य गुलाब, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, शुभम कातांगळे, अरुण तंबरे, गणेश राऊत, गोरख काळे, वजीर, प्रदीप गायकवाड, खालेद, फारुख भाई, लल्लू खान, संजय काळे, गणी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोकळ घोषणा करणाऱ्या शासनाच्या निषेधार्थ कागदोपत्री विकासकामांचे भूमिपूजन व अवास्तव मागण्यांना लॉलीपॉप देऊन मंजुरी:- डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र मंत्रिमंडळाकडुन मतदारांना आकर्षित करण्यासाठी दररोज अवास्तव घोषणांचा पाऊस पडत असुन जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत असुन सरकारच्या धोरणाच्या निषेधार्थ आज दि.१५ मंगळवार रोजी सकाळी साडे ११ वाजता शिवतीर्थ लिंबागणेश येथे पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी प्रतिकात्मक मंत्रीमंडळाची बैठक घेण्यात आली. कागदोपत्री विकास कामांचे श्रीफळ फोडून भुमिपुजन करण्यात आले.व अवास्तव मागण्यांना लॉलीपॉप देऊन मंजुरी देण्यात आली.यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, प्रदेशाध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ती विचार मंच बाळासाहेब मोरे, विक्रांत वाणी, अक्षय वाणी,महावीर वाणी,दत्ता झोडगे,बाळासाहेब सोनवणे, बिभीषण मुळीक, बालासाहेब माने,अक्षय थोरात, ज्ञानेश्वर काटवटे, महादेव थोरात, सुधीर जाधव, रामहरी चाळक, जालिंदर कोळपे, लक्ष्मण सांगळे, चोखोबा निर्मळ, राजाभाऊ जाधव साहेबराव फरताडे,आश्रुबा वाणी, आदि सहभागी होते. या मंत्रीमंडळ बैठकीत खालील मागण्या मंजूर करण्यात आल्या.

बीड तालुक्यातील बीड शहरापासून १७ किलोमीटर अंतरावरील फुकेवाडी ग्रामस्थांनी रस्ता नसल्याने अद्याप एसटी पाहिलेली नाही त्यामुळे त्याठिकाणी विमानतळ मंजूर करण्यात आले.तसेच डोंगर द-यातील वाडी वस्त्यांना रस्ता नसल्याने रेल्वे मंजुरीला तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील बहुतांश गावांना दळणवळणाची साधने नाहीत, रस्ते नाहीत.मात्रोश्री पाणंद योजनेंतर्गत रस्ता कामांना मंजुरी नाही त्यांच्या निषेधार्थ पाणंद रस्ते नसलेल्या गावांना स्मार्ट गाव योजनेंतर्गत मंजुरी देण्यात आली आहे.बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विमा कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे २०२१ आणि २०२२ सालचा पिकविमा अद्याप न मिळाल्याने भविष्यातील २०३० सालचा पिक विमा आत्ताच मंजुर करण्याची शिफारस मंत्री मंडळातर्फे पिक विमा कंपन्यांना सुचना देण्याचा ठराव घेण्यात आला.

समाजामध्ये जातीधर्माच्या नावाने सोशल मिडियावर समाज विघातकी पोष्ट करून कायदा व सुव्यवस्था बिघडवणा-यांना शांतता पुरस्कार प्रदान करण्यात येईल. त्यांना दरमहा मोफत डाटा पुरवण्याची तरतूद करण्यात येईल.उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी मराठा आरक्षण, धनगर आरक्षण, मुस्लिम आरक्षण आदी प्रकरणी समाजाची फसवणूक करण्यात तरबेज असुन त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून देवेंद्र फडणवीस फसवणूक महामंडळाची स्थापना करण्यात आली.



# कृषी अधिकारी कार्यालय माजलगाव कडे जाणारा रस्ता चिखलमय

विकासाच्या गप्पा मारणाऱ्या आमदार प्रकाश सोळंकेला रस्ताही करता आला नाही.

माजलगांव । सुनिल थोरात

कृषी अधिकारी कार्यालय माजलगाव येथे दररोज कितीतरी शेतकऱ्यांचे काही ना काही काम पडत असते काहींचे अनुदान जमा झालेले नाही किंवा पीएम किसान चे हप्ते पडत नाहीत किंवा शेतीविषयक काही कामे असतात त्यामुळे या कार्यालयाकडे चकरा माराव्या लागतात पण या कार्यालयाकडे जाण्यासाठी चिखलातून कसरत करून जावे लागते हे माजलगाव तालुक्यातल्या शेतकऱ्यांचं मोठं दुर्दैव आहे. कृषी अधिकारी कार्यालय माजलगाव हे कितीतरी वर्षापासून



विकासाच्या प्रतीक्षेत आहे पण या कार्यालयाकडे कोणाचेही लक्ष नाही. या कार्यालयाकडे येण्यासाठी शेतकऱ्यांना या रस्त्यावरील साचलेल्या पाण्यातून चिखल तुडवत जावे लागते.प्रकाश सोळंके नुसत्या मोठ्या मोठ्या गप्पा मारतात मी हे केलं मी ते केलं पण त्यांना हा रस्ता दिसत नाही का? असा सवाल माजलगाव च्या जनतेने केला आहे. स्वतःला विकास पुरुष समजणाऱ्या आमदार प्रकाश सोळंके ने आपल्या मतदारसंघात काय विकास केला याचे उत्तर द्यावे. पावसाने शेतकरी हैराण झालेला आहे शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान झालेले आहे. कुठेही गेले तरी शेतकऱ्यांच्या वाट्याला हाल अपेष्टाच येत आहेत. प्रकाश दादा तुम्ही फक्त या रस्त्यावरून कार्यालयाकडे जाऊन दाखवा मग तुम्हालाही कळेल की तुम्ही इतके वर्षे या माजलगांव चे आमदार होतात आणि तुम्ही किती विकास केलेला आहे असा सवाल माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी केलेला आहे.



**आज गुरूवर्य भगवान महाराज सार्व वाचनालय इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे भारताताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिनग्रंथाचे प्रदर्शन व वाचक मेळाव्याने साजरा करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना म्हटले ग्रंथालयातील नवनवीन ग्रंथ प्रदर्शनाच्या वाचनालयाच्या माध्यमातून वाचकांना वाचनासाठी उपलब्ध करून देण्याचे काम हे वाचनालय चांगल्या पद्धतीने करत आहे.या मोबाईलच्या युगात वाचन संस्कृती वाढवण्यासाठी, टिकवण्यासाठी वाचकांनी ज्ञान वाढवण्यासाठी चांगली पुस्तके वाचली पाहिजेत.पुस्तकातुनच आदर्श माणूस घडतो.याचे उदाहरण म्हणजे मिसाईल मॅन भारतरत्न डॉ कलाम आहेत.असे मत माजी मुख्याधापक श्री एम डी पांचाळसर यांनी ग्रंथ प्रदर्शनाच्या व वाचक मेळाव्याचे उद्घाटन करताना आपल्या मार्गदर्शनात व्यक्त केले.डॉ कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भगवान विद्यालयाचे निवृत्त पर्यवेक्षक श्री वाय एस भोंडवेसर होते.यावेळी मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष डॉ राजेंद्र सानप,जिल्हा ग्रंथालय संघ संचालक शेख इब्राहिम,विश्वनाथ भवर,आर के भोंडवे,ग मा शहाणे, आश्रुबा नागरगोजे,गोरख इंदुलकर, धनंजय सानप, खेमाजी जायभाय, दिनकर ढाकणे,एच आर सानप, अश्विनी नागरे, हर्षदा सानप,सौ मिरा सानप, खेडकर,शेख आदीसह असंख्य वाचक उपस्थित होते.सर्व प्रमुख अतिथीचे स्वागत,सुत्रसंचलन, आभार प्रदर्शन वाचनालयाचे विश्वस्त धनंजय सानप यांनी केले.या ग्रंथप्रदर्शनाचा लाभ परिसरातील असंख्य ग्रंथप्रेमी, वाचकांनी,नागरीकांनी घेतला..**

## मा.ना.एकनाथरावजी शिंदे साहेब, महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री यांना दिवाळीसाठी पोलीस कर्मचारी यांचे बंद केलेले

# बोनस चालू करुन बोनसह ऍडव्हान्स २५०००/- रु देण्यात यावे - रविंद्र शिनगारे

मा. ना. एकनाथरावजी शिंदे साहेब, महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.यांनी पोलीस कर्मचाऱ्यांचे बंद पडलेले दिवाळी बोनस चालू करून ऊन वारा पाऊस याची कसलेही तमा न बाळगता ऑन ड्युटी २४ तास आपले कर्तव्य बजावत कोणताही सण उत्सव कुटुंबासोबत साजरा करायला न मिळणारी महाराष्ट्र शासनाचे एकमेव कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी यांना दिवाळीसाठी बोनसह ऍडव्हान्स २५०००/- रू देऊन राज्यातील २५ लाख पोलीस कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करावी. ही अपेक्षा पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्र राज्याच्या वतीने प्रसिद्ध माध्यमाच्या वतीने करण्यात येत आहे महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी राज्यातील सर्व समाजातील गोरगरीब,शोषित पिढीत, शेतकरी, महिला, युवा वर्ग, जेष्ठ नागरीक सर्व वर्गातीलर शेवटच्या घटकापर्यंत न्याय दिल्या बद्दल मनपुर्वक आपले आभिनंदन, सर्व वर्गाना न्याय देत आपण महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री ठरला आहात तरी आपणाकडे पोलीस कर्मचाऱ्यांचे बंद केलेले दिवाळी बोनस चालू करताना ही अपेक्षा लाखो पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या असून दिवाळीसाठी पोलीस कर्मचारी यांना बोनसह ऍडव्हान्स २५०००/- रू देऊन



माहे आक्टोबरची दिवाळी सनापुर्वी द्यावी अशी आमची महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री म्हणुन आपल्याकडे मागणी आहे. ती पूर्ण करावी हि पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्र राज्य च्या राज्याध्यक्ष रवींद्र शिनगारे यांच्यावतीने करण्यात आले आहे

# राष्ट्रीय क्रांती सेनेच्या वतीने माजलगाव तहसील कार्यालयावर धडक मोर्चा

## संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे यांनी इच्छुक आमदारांचे सांगितले कारनामे

माजलगांव ।सुनिल थोरात

राष्ट्रीय क्रांती सेनेच्या वतीने माजलगाव तहसील कार्यालयावर विविध मागण्यासाठी धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चामध्ये खालील प्रमुख मागण्या होत्या माजलगाव धारूर वडवणी या प्रत्येक तालुक्याला एक हजार कोटीचे पॅकेज देऊन पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र निर्माण करून मोठे मोठे उद्योग आणण्यात यावे. तसेच रामगिरी व नितेश राणे यांनी मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात यावी. ओबीसी व मुस्लिम समाजाला लोकसभेत राजकीय आरक्षण देऊन एससी एसटी च्या धरतीवर जागा आरक्षित करण्यात याव्यात या मागण्यासाठी माजलगाव तहसिलवर मोर्चा काढण्यात आला. माजलगाव मतदार संघात पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र निर्माण करून मोठे मोठे उद्योग आणण्यात यावे म्हणजे येथील बेरोजगार ऊसतोड मजुरांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होईल यासाठी सरकारने




विशेष पॅकेज द्यावे. माजलगाव मतदार संघात बेरोजगार तरुणांची मोठी संख्या वाढत चाललेली आहे. माजलगाव मतदार संघात अंदाजे दीड लाख ते एक लाख ७० हजार लोक ऊस तोडणी साठी पश्चिम महाराष्ट्र सह कर्नाटक व इतर राज्यांमध्ये स्थलांतरित होतात. तसेच येथील बेरोजगारांना टेक्निकल कोर्स कुशल कारागीर आणि अकुशल कारागीर यांना पुणे, मुंबई, औरंगाबाद, सुरत, नाशिक या ठिकाणी पोटाचा उदरनिर्वाह करण्यासाठी कामाला जावे लागते म्हणून माजलगाव मतदार संघात या पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र सारखी औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्याची गरज आहे. तसेच माजलगाव मतदार संघात स्थानिक उद्योजकांना ५० टक्के उद्योग निर्माण करण्यासाठी अनुदान देण्यात यावे. बाहेरील येणाऱ्या उद्योजकांसाठी वीज जी एसटी इन्कम टॅक्स, टॅक्स फ्री व कमी दरात त्यांना औद्योगिक क्षेत्रातील जमीन उपलब्ध करून देण्यात यावी त्यामुळे मोठे मोठे उद्योजक बीड जिल्ह्यात उद्योग उभारण्यास आकर्षित होतील. स्थानिक उद्योजकांना उद्योग उभारण्यासाठी प्रशिक्षण फ्री मध्ये उपलब्ध करून देण्यात यावे. मुस्लिम ओबीसी समाजाला विधानसभा व लोकसभा एस सी, एस टी च्या धरतीवर राजकीय आरक्षण देऊन लोकसंख्या नुसार लोकसभा व विधानसभेत आरक्षित करण्यात याव्यात. यासाठी माजलगाव मतदार संघात तिनी तालुक्याला प्रत्येकी एक हजार कोटीचे पॅकेज देण्यात यावे टोटल मतदारसंघात ३००० कोटीचे पॅकेज राज्य व केंद्र सरकारने द्यावे वरील मागण्यांसाठी सरकारने प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे जेणेकरून जिल्ह्यातील वाढत चाललेले गुन्हेगारी बेरोजगारी मागासलेपणा आत्महत्येचे प्रमाण कमी करण्यासाठी फायदा होईल तसेच तरुण बेरोजगार टेक्निकल कुशल अकुशल कामगार स्थानिक उद्योजकांना याचा फायदा होईल अशा विविध मागण्यांसाठी माजलगाव तहसील कार्यालयावर मोर्चा धडकला. यावेळी मोठ्या संख्येने या मोर्चामध्ये नागरिकांची उपस्थिती होती.

# आजी .माजी. पालक मंत्र्याच्या जन्मभूमी मध्ये डॉ. आंबेडकर यांच्या नियोजित स्मारकच्या

## जागेची नमुना नंबर .८ अ. ला. नसल्यामुळे अमरण उपोषण

परळी । प्रतिनिधी

मोजे. नाथरा तालुका परळी ( वैजनाथ )जिल्हा बीड .येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित स्मारक ची जागा ग्रामपंचायत नमुना नंबर ८ अ ला नोंद नसल्यामुळे व त्वरित नोंद घेऊन पुतळ्यासमोरील जीर्ण अवस्थेत असलेल्या सभागृहाच्या ठिकाणी सुसज्ज बौद्ध विहाराची निर्मिती करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यसमारक का साठी निधी तात्काळ उपलब्ध करा या मागणीसाठी दिनांक. १७/ १० / २०२४ रोजी .ऑल इंडिया पँथर सेना .परळी तालुका कमिटीच्या वतीने मा. उपविभागीय ये अधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय परळी. ( वैजनाथ ) जिल्हा बीड. यांच्या दालनात आमरण उपोषण करण्याबाबत संबंधित सर्व शासकीय कार्यालयात मध्ये निवेदन देण्यात आले आहे त्यावेळी ऑल इंडिया पँथर सेना .पदाधिकारी यांनी निवेदन देऊन या मागणीचा तात्काळ निर्णय घेऊन नाथरा .या गावी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी त्वरित निधी उपलब्ध करावा या मागणीसाठी आमरण उपोषण



करण्यात येत आहे यासाठी निवेदन देण्यात आले आतापर्यंत विहारासाठी निधी उपलब्ध केला नाही पहिले दहा वर्षे आणि चालू पाच वर्षे गेले असून. पालकमंत्री .यांच्या जन्मभूमी मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे .समर्थासाठी निधी उपलब्ध केला नाही यासाठी .ऑल इंडिया प्रांत जायला राष्ट्रीय अध्यक्ष. दीपक केदार यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण केले जाणार आहे असे ऑल इंडिया पँथर सेना. परळी तालुका कमिटी व भीमसैनिक यांनी या निवेदनात म्हटले आहे की असे उपविभागीय परळी कार्यालय येथे .असंख्य भीमसैनिक कार्यकर्ते निवेदन देताना दिसून येत आहेत.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवार रोजी जाधव गुरुजी यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

**विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या**

**वर्षातील दुसऱ्या पुण्यतिथी आश्विन शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. जाधव गुरुजी माजी शिक्षणाधिकारी रा. दादेगाव ता.आष्टी जि.बीड यांचे गुरुवार दिनांक १७ ऑक्टोंबर २०२४ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे.**

तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी देवळा ता. वडवणी जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## सौ.प्रियांकाताई शिवप्रसाद खेडकर यांनी गेवराई मतदार संघातील १० हजार महिलांना घडविले

# मोहटा देवी दर्शन

वार्ताहर :- नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण गेवराई विधानसभा मतदारसंघातील माता-भगिनींना उत्साहाच्या वातावरणात सौ. प्रियांकाताई शिवप्रसाद खेडकर मित्रमंडळ आयोजित तालुक्यातील विविध गावातून आलेल्या भक्तांची मोहटादेवी दर्शन यात्रा अत्यंत भक्तिभावाने आणि आनंदात पार पडली. या यात्रेत सर्व गावांमधून आलेले भक्तगण मोठ्या उत्साहाने सहभागी झाले आणि मोहटादेवीच्या पवित्र दर्शनाचा लाभ घेतला. मोहटा देवी यात्रा महोत्सव सौ प्रियंका ताई शिवप्रसाद खेडकर व मित्र मंडळ यांनी खास ट्रॅव्हल्स व स्कूल बसची व्यवस्था करून तसेच महिलांना फराळाची सोय करून दिली.



या यात्रेने भक्ती आणि एकात्मतेचा संदेश दिला आणि आपापल्या गावातून आलेल्या लोकांमध्ये आपुलकी आणि सहकार्याची भावना वाढवली. हा सोहळा तालुक्यातील सर्वांसाठी एक संस्मरणीय आणि श्रद्धायुक्त अनुभव ठरला.आपल्या सर्वांच्या सहकार्याने आणि प्रेमाने ही यात्रा यशस्वी झाली याबद्दल मनःपूर्वक आभार.

# बीडमध्ये युवासेनेचा अभुतपुर्व मेळावा संपन्न

- हजारो युवा सैनिकांसह बाजीराव चव्हाणांचे बीडमध्ये शक्तिप्रदर्शन
  शेतकऱ्यांच लेकरु बाजीराव चव्हाण बीडचा आमदार झाल्यास हा बीडकरांचा आनंद - पुर्वेश सरनाईक
  वरीष्ठ जो आदेश देतील तो मला मान्य - बाजीराव चव्हाण
- युवासेनेच्या रॅलीत आपली ताकत दाखवत बाजीराव चव्हाण यांनी विधानसभेसाठी दंड थोपटले
  बाजीराव चव्हाणयांना विधानसभा लढवण्याची इच्छा व्यक्त करण्याचा पुर्ण अधिकारी - पुर्वेश सरनाईक
  युवासेना राज्यकार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्याकडून बाजीराव चव्हाणांना विधानसभा लढवण्याचे संकेत, पुर्वेश सरनाईक यांच्या उपस्थितीत बाजीराव चव्हाण यांनी विधानसभेसाठी दंड थोपटले.
- आरे कोण आला रे कोण आला शिवसेनेचा वाघ आला हजारों युवांच्या घोषणाने बीड शहर दुमदुमले, एकच वादा बाजीराव दादा; हजारों युवांच्या घोषणातुन बाजीराव चव्हाण दमदार आमदार म्हणून घोषवाक्य. सरनाईक यांचा विधानसभेसाठी ग्रिन सिग्नल मिळताच युवासेनेच्या युवकांत आनंदाचे वातावरण.



बीड प्रतिनिधी : राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे साहेब व खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावर विश्वास ठेऊन महाराष्ट्रातील युवासेना राज्यात आपली पाळंमुळं मजबुत करण्यासाठी सज्ज झाली आहे. त्याचेच अभुतपुर्व चित्र आज बीडच्या युवा सेनेच्या युवा संवाद मेळाव्यातुन दिसून आले. आरोग्य दूत बाजीराव चव्हाण हजारोंच्या संख्येने युवाशक्तीची रॅली काढुन आपल्या मागील युवासेना युवाशक्ती दाखवुन दिली आहे. युवासेना राज्यकार्याध्यक्ष श्री. पुर्वेशजी सरनाईक यांच्या उपस्थितीत आज बाजीराव दादा चव्हाण यांनी शेकडो बाईक, व चारचाकी व्दारे प्रचंड प्रमाणात युवासेना, युवाशक्ती सोबती घेत ना भुतो ना भविष्य अशी अभुतपुर्व रॅली बीड शहरातुन काढुन, बीड जिल्ह्यातील आजी माजी भावींना हादरा दिला आहे. त्यामुळे सुजान पुढाऱ्यांना बाजीराव चव्हाण यांची धास्ती नक्कीच बसली आहे.

आज बीडमध्ये युवासेनेचा युवा संवाद मेळावा संपन्न झाला त्यावेळी मेळाव्यास प्रमुख उपस्थिती म्हणून युवासेना राज्यकार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक हे उपस्थित होते. यावेळी बाजीराव चव्हाण यांनी आपल्याला विधानसभा लढवण्याची इच्छा व्यक्त केली. सोबत यांच्या हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या युवाशक्तीनेही आपल्या घोषवाक्यातुन बाजीराव चव्हाण यांनाच संधी मिळावी ही ईच्छा दर्शवीली आहे. कार्यक्रमात यावेळी युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक बाजीराव चव्हाण यांच्या बद्दल व्यासपीठावर बोलतांना म्हणाले की बाजीराव चव्हाण यांनी बीडमध्ये आजपर्यंत कोणीजे केलं नाही ते एकट्या बाजीराव चव्हाण यांनी जनसेवेचे काम करुन दाखवले आहे. बीडच्या लाखों गोरं गरीबांना आपल्या शस्त्रक्रिया साठी त्यांनी दहा कोटिंच्या वर वैद्यकीय मदत मिळवुन दिली आहे. तसेच आज पर्यंत त्यांनी आपल्या कार्यालयात बसुन हजारो गोरं गरीबांचे विवीध प्रशन सोडवुन त्यांना न्याय मिळवून दिला आहे. आज बीड मधील जनता त्यांना आपला हक्काचा बाजीराव मानत आहे. त्यामुळे त्यांना येणाऱ्या विधानसभात निवडणुक लढवण्याची इच्छा व्यक्त करण्याचा त्यांना पुर्ण अधिकारी आहे. सोबतच बाजीराव चव्हाण हा एक शेतकऱ्यांचा पोरगा आहे एक सामान्य घरातुन आलेला शेतकऱ्याचा मुलगा आहे. आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या विश्वासाचा माणुस ते बनले आहेत. आज बीडकरांचा मणातला आपला माणुस बाजीराव चव्हाण हे बनले आहेत. त्यामुळे यांच्यावर मला पुर्ण विश्वास आहे की बाजीराव चव्हाण यांना वरिष्ठांकडुन ग्रिन सिग्नल मिळाला तर ते येणाऱ्या विधानसभा मध्ये नक्कीच आपल्या संधीचं सोनं करतील व बीडचा कायापालट केल्याशिवाय राहणार नाहीत. म्हणून मी खुद मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व खासदार श्रीकांत शिंदे साहेब यांच्या कानावर बाजीराव चव्हाण यांचे काम व बीड मध्ये चालु असलेले त्यांचे विविध कार्य पोहचवणार आहे. तसेच त्यांना मी न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्या पाठीशी उभा आहे. कारण आजच्या रॅलीतुन बाजीराव चव्हाण यांनी दाखवून दिले की बीडमध्ये युवासेना पुर्ण त्यांनी मजबूत पणेउभा केली आहे. बीड जिल्ह्यातील हजारोंच्या संख्येने युवाशक्ती त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. यावरुनच समजते की बाजीराव चव्हाण बीडमध्ये शिवसेनेचा खंबीर उमेदवार आहे. म्हणून युवासेना राज्यकार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्यावर खुश असल्याचे दिसून आले. या रॅलीस व युवासंवाद मेळाव्याला पुर्ण ताकतीशी यशस्वी करणारे युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, जिल्हाप्रमुख अजय सुरवसे यांनी घेतले. वरील सर्व घडामोडींतुन दिसुन येते की बीडची विधानसभेची माळा बाजीराव चव्हाण यांच्या गळ्यात पडणार असल्याचे संकेत आहेत. त्यामुळे बाजीराव चव्हाण यांच्या हजारो युवा सैनिक, व कार्यकर्त्यांनी विधानसभेला बाजीराव चव्हाण यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहण्याचे व त्यांना जिंकण्यासाठी आपली कंबर असलेली पुर्व दिशा आजच्या शक्ती प्रदर्शनातुन दिसुन आली आहे.

# श्रीराम कथेसाठी सेलू शहर सज्ज !!!

- स्वामी गोविंददेवगिरिजी महाराजांच्या वाणीतून आजपासून कथा प्रारंभ
  भव्य शोभायात्रा सेलू येथे आयोजित राष्ट्रसंत परमपूज्यस्वामी गोविंददेवगिरिजी महाराज यांच्या श्रीराम कथेसाठी भव्य मंडप उभारण्यात आला आहे.

सेलू (प्रतिनिधी)

अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष, राष्ट्रसंत परमपूज्यस्वामी गोविंददेवगिरिजी महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून सेलू येथील नूतन विद्यालयाच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या 'हनुमानगढ' परिसरात मंगळवारपासून (१५ ऑक्टोबर) श्रीराम कथेला प्रारंभ होत आहे. कथेच्या निमित्ताने शहरात जागोजागी कथेच्या बॅनर, होर्डींगने सर्वांचे लक्ष वेधले घेतले असून कथेसाठी सेलू शहर सज्ज झाले आहे.

बुधवार, २३ ऑक्टोबरपर्यंत दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत श्रीराम कथा (मराठीतून) होईल. यानिमित्ताने मंगळवारी सकाळी ८ वाजता श्रीकेशवराज बाबासाहेब मंदीर ते श्रीबालाजी मंदीरपर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. क्रांतीचौक, धनलक्ष्मी मंगल कार्यालय, सारंगीगल्ली हनुमान मंदिर, गंगाधर स्वामी मठ, मारवाडी गल्ली चौक मार्गाने श्री बालाजी मंदिरमध्ये शोभायात्रेची सांगता होणार आहे.

शोभायात्रेत श्रीरामायणासह विविध ग्रंथ दिंडी, बँड पथक, धर्म ध्वज, अश्व, मारोती, ध्वजधारी युवक, लेझीम पथक मुले-मुली, श्रीराम उत्सव मूर्ती, कलशधारी, तुळसधारी माता भगिनी, महिला भजनी व वारकरी भजनी मंडळ, वेद विद्यालयाचे विद्यार्थी, स्वामीजींचा रथ, माता-भगिनी, बंधू सहभागी होणार आहेत. तसेच विविध संत महात्मे, श्रीराम जन्म, गुरुकुल, केवटद्वारा श्रीराम चरण पूजा, प्रभू राम हनुमंत भेट, रामराज्यभिषेक, छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य शपथ, भारतमाता व महापुरुषांचे सजीव देखावे विविध शाळांचे विद्यार्थी सादर करणार आहेत. शोभायात्रेत व कथा श्रवणासाठी सेलू शहर व परिसरातील महिला, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक जयप्रकाश बिहाणी, विजयकुमार बिहाणी आणि बिहाणी परिवारातर्फे करण्यात आले आहे.

## भव्य मंडप, व्यासपीठ, नऊ तीर्थधाम

श्रीरामकथेसाठी सेलू येथील नूतन विद्यालयाच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या 'हनुमानगढ' परिसरात ३८ हजार ४०० चौरसफुट जागेत भव्य वाटरप्रुफ मंडप उभारण्यात आला आहे. ३२ बाय ६० फूट आकाराचे भव्य व्यासपीठ असून नऊ दिवस कथास्थळी नऊ तीर्थधामांचे स्वरूप साकारले जाणार आहे. यामध्ये अयोध्या, तिरूपती बालाजी, वृंदावन, श्री जगन्नाथ, व्दारका, श्रीक्षेत्र पंढरपूर, श्री रामेश्वर, श्री बद्रीनाथ धाम आणि श्री सारासारजी आदींचा समावेश आहे. सात ते आठ हजार श्रोत्यांची आसन व्यवस्था आहे. यामध्ये तीन हजार खुर्च्यांसह बसण्यासाठी मॅट, ४० कुलर, परिसरात ध्वजस्तंभ, गोशाळा, रामकथा कार्यालय, पार्किंग व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे. कथेसाठी विविध समिती कार्यरत असून जागोजागी स्वयंसेवक असणार आहे.




## विविध अध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम

राष्ट्रसंत स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून १५ ऑक्टोबरपासून ९ दिवस पंचक्रोशीतील भाविकांना श्रीराम कथा श्रवणाचा लाभ मिळणार आहे. कथेदरम्यान, रविवारी, २० ऑक्टोबर रोजी सकाळी साडे नऊ वाजता गीता परिवारव्दारा आयोजित सामुदायिक श्रीरामरक्षा स्त्रोत्र पठण, योगा सूर्यनमस्कार, श्रीमद्भगवतगीता पठण, देशभक्तीपर गीते आदींचे सादरीकरण परभणी रोडवरील समर्थ जिनिंग परिसरात होणार आहे. यामध्ये सेलू शहरातील २० शाळेतील विद्यार्थी सहभागी होत आहेत. सोमवारी, २१ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता श्रद्धेय गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत भजनसंध्या आहे. तर १८ ते २२ ऑक्टोबर कालावधीत गीता परिवाराच्या वतीने श्री साई मंदिरात सकाळी ८ ते १० या वेळेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या ओवीबध्द जीवन चरित्राचे श्रीशिवप्रताप पारायण होणार आहे.

### विविध क्षेत्रातील व्यक्तित्वांचा सन्मान

कथेदरम्यान विविध क्षेत्रात समर्पित भावाने कार्यसेवा देणाऱ्या सेलू शहर व परिसरातील व्यक्तित्वांचा राष्ट्रसंत स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांच्या हस्ते पालकांसह सन्मान करण्यात येणार आहे. यामध्ये देश सेवेबद्दल - लेफ्टनंट आकाश संजय रोडगे, मंगेश रघुनाथ देशमुख, संगमेश कैलास मलवडे, बजरंग टीकमचंद परदेशी, वृक्ष संवर्धन आणि वृक्षारोपण-अभिजीत राजूरकर, अध्यात्म-डाके महाराज मानवत, गौ-पालक राजेंद्रजी करवा सेलू, कुंजबिहारीजी काबरा मानवत, प्रकाशजी बंग गुंज, ग्रामीणभागात गुरुकुलच्या माध्यमातून निवासी शिक्षणाच्या सेवेबद्दल रामकिशन (आबा) सोळंके, कीर्तन कुलसेवा योगेश महाराज साळेगांवकर, शंतनू शिवाजीराव पाठक आदींचा सन्मान करण्यात येणार आहे,

# विधानसभा निवडणुकीपूर्वी सरकारची दिवाळी भेट, एसटीची भाडेवाढ रद्द

राज्य परिवहन महामंडळाला सध्या रोज २३ ते २४ कोटी रुपयांचे उत्पन्न प्रवासी वाहतुकीतून मिळतात. तसेच दिवाळीत करण्यात येणाऱ्या हंगामी भाडेवाढीमुळे त्यात अधिक ६ कोटी रुपयांची भर पडते. यामुळे दिवाळीच्या सुटीच्या काळातील महिन्यात महामंडळाचे उत्पन्न ९५० ते एक हजार कोटी रुपये होते.

विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारकडून घोषणा आणि योजनांची बरसात केली जात आहे. मंत्रिमंडळाची बैठक घेऊन निर्णयांचा सपाटा लावला जात आहे. मुंबईतील टोल नाक्यावरील हलक्या वाहनांचा टोल रद्द करण्याचा निर्णय सोमवारी राज्य शासनाने घेतला आहे. आता दरवर्षी दिवाळीत महिन्याभरासाठी एसटीची करण्यात येणारी भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे निवडणूक जाहीर होण्यापूर्वी लालपरीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सरकारने ही दिवाळी भेटच दिली आहे.

असे असते उत्पन्नाचे गणित

राज्य परिवहन महामंडळाला सध्या रोज २३ ते २४ कोटी रुपयांचे उत्पन्न प्रवासी वाहतुकीतून मिळतात. तसेच दिवाळीत करण्यात येणाऱ्या हंगामी भाडेवाढीमुळे त्यात अधिक ६ कोटी रुपयांची भर पडते. यामुळे दिवाळीच्या सुटीच्या काळातील महिन्यात महामंडळाचे उत्पन्न ९५० ते एक हजार कोटी रुपये होते.




## कोणत्याही बसमध्ये भाडेवाढ नसणार

एसटीने हंगामी भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेतल्यामुळे महामंडळाच्या तिजोरीत जमा होणारी अतिरिक्त रक्कम यंदा जमा होणार नाही. एसटीला दिवाळीच्या काळात चांगले उत्पन्न मिळते. यावर्षीही उत्पन्न वाढीसाठी हा मार्ग स्वीकारला होता. परंतु आता भाडेवाढ करण्याचा निर्णय रद्द करण्यात आला आहे. आता विठाई, शिवशाही, निमआराम बसेससाठी भाडेवाढ लागू असणार नाही.

## सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा

दरवर्षी दिवाळीला अनेक लोक आपल्या घरी जातात. त्यासाठी लाखो लोक रेल्वेने तर लाखो लोक परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करतात. तसेच बरेच जण सुट्यामुळे पर्यटनस्थळी फिरण्याचे नियोजन करतात. या दरम्यान झालेली गर्दीचा फायदा उचलत खासगी ट्रॅव्हल्सकडून भरमसाठ भाडेवाढ केली जाते. त्याचवेळी दरवर्षी एसटी महामंडळाकडून १० टक्के हंगामी भाडेवाढ केली जाते. यंदाही ही भाडेवाढ २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर दरम्यान करण्याचे परिपत्रक काढण्यात आले. परंतु विधानसभा निवडणुकीमुळे राज्यातील जनतेची नाराजी निर्माण होऊ नये म्हणून भाडेवाढ रद्द करण्यात आली. यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

# धनंजय मुंडेंचे परळी क्रीडा संकुल उभारणीसाठी मोठे पाऊल

**महानिर्मितीची ५ हेक्टर ३० आर जागा क्रीडा संकुलासाठी मोफत हस्तांतरित !**

## ऊर्जा विभागाकडुन शासन निर्णय निर्गमित; क्रीडा संकुल उभारणीचा मार्ग मोकळा

मुंबई (प्रतिनिधी)

परळी वैजनाथ शहरातील व तालुक्यातील नागरिकांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या क्रीडा संकुल उभारण्याच्या दृष्टीने पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मोठे पाऊल उचलले असून, परळी शहरालगतच्या जलालपूर येथील ५ हेक्टर ३० आर जागा क्रीडा संकुलास मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय आज धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून ऊर्जा विभागाने घेतला आहे.

सदर ५ हेक्टर ३० आर जमीन महानिर्मिती कडून मोफत घेऊन ती महसूल विभागास हस्तांतरित करण्यात येत असून, याबाबतचा शासन निर्णय आज उद्योग-ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केला आहे. त्यामुळे आता परळीच्या क्रीडा संकुल उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

परळीच्या मातीतून विविध क्रीडा प्रकारातील अनेक खेळाडू राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले आहेत. दरवर्षी धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर क्रिकेटसह विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजनही केले जाते. मात्र या खेळाडूंना सरावासाठी क्रीडा संकुल उपलब्ध नसल्याने खेळाडूंची गैरसोय होत होती.त्यादृष्टीने धनंजय मुंडे यांनी क्रीडा विभागामार्फत राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे



यांच्यामार्फत जमीन ऊर्जा विभागाकडून हस्तांतरित करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.सदर प्रस्ताव मंजूर करण्यासाठी धनंजय मुंडे यांनी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला अखेर आज यश आले असून महानिर्मितीच्या परळी येथील औष्णिक विद्युत केंद्राच्या मालकीची जलालपुर येथील ८.५ हेक्टर जागेपैकी वापरात नसलेली व भविष्यात कोणतेही प्रयोजन नसलेली ५ हेक्टर ३० आर जमीन क्रीडा संकुलासाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे.

परळीत धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार भव्य क्रीडा संकुल अद्ययावत सोयी-सुविधांसह उभारले जावे

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतून लाभार्थ्यांना वगळले

## मयुरी खेडकर-मस्के यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार, आंदोलनाचा दिला इशारा

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना तसेच इतर गोरगरीबांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेतून गेवराई तालुक्यातील अनेक गावे तसेच शेकडो लाभार्थ्यांना वगळण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी गेवराई विधानसभा मतदार संघाच्या नेत्या मयुरी खेडकर-मस्के यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली असून लाभार्थ्यांचा यादीत समावेश करण्याची मागणी केली आहे. दरम्यान घरकुलची मागणी केलेल्या लाभार्थ्यांचा सदरील घरकुल यादीत समावेश न केल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा या निवेदनाद्वारे मयुरी खेडकर-मस्के यांनी दिला आहे.

राज्यात इतर मागास समाजातील नागरिकांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल राबविण्यात येत आहे. याचबरोबर पंतप्रधान आवास योजना, यशवंतराव चव्हाण घरकुल योजना बंजारा, वंजारी, वडार समाज तसेच रमाई घरकुल योजना, शबरी घरकुल योजना या सुद्धा योजनेतून गोरगरीबांना घरकुल देऊन हक्काचा निवारा शासनाकडून दिला जातो. दरम्यान गेवराई तालुक्यातील गावागावातून या योजनेत गोरगरीबांनी अर्ज दाखल करुन घरकुलची मागणी केली होती. मात्र या घरकुल यादीतून गेवराई तालुक्यातील अनेक गावे तसेच मागणी केलेल्या शेकडो लोकांची नावे वगळण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मंजूर घरकुल योजनेमुळे इतर मागास समाजातील कुटुंबांना हक्काचे घर मिळणार होते. मात्र मागणी केलेल्या गोरगरीबांची नावे यादीत आलीच नाहीत. त्यामुळे गरजू लाभार्थ्यांचा घरकुल यादीत समावेश का करण्यात आला नाही? असा प्रश्न गेवराई विधानसभा मतदार संघाच्या नेत्या मयुरी खेडकर-मस्के यांनी उपस्थित केला आहे. तसेच ज्या लोकांनी घरकुल मिळावे यासाठी अर्ज दाखल केले, त्यांच्यावर अन्याय न करता मागणी केलेल्या प्रत्येकाला घरकुल देण्यात यावे. त्याचबरोबर वगळण्यात आलेल्या गावांना सुद्धा यादीमध्ये समाविष्ट करावे, यादीमध्ये कुठल्याही प्रकारच्या व्यक्तींवर अन्याय होता कामा नये, याप्रकरणी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे



तक्रार देखील दाखल केली आहे. यामध्ये घरकुल योजनेतून वगळण्यात आलेल्या लाभार्थ्यांची नावे समावेश करण्याची मागणी करण्यात आली असून हि मागणी केलेल्या लाभार्थ्यांची नावे यादीत समावेश न केल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा मयुरी खेडकर-मस्के यांनी दिला आहे.



# क्रांतिकारी शिक्षक संघटनेचच्या कार्यालयाचे जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बशीरगंज चौकात क्रांतिकारी शिक्षक संघटनेच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. संघटनेचे नेते शहीद कादरी यांनी संघटने बाबत माहिती दिली . यावेळी मार्गदर्शक शहाफिज साहेब, नरसिंग नायकवाडे,शशिकांत गायकवाड, आसरार खान, अजीज मुफ्ती ,मजहर सर ,तोफिक, फजल, जावेद, आंबेद,रजाक , इमरान काबळे,शिनगारे,पवार, मुळे युनूस परवेज तसेच पदधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मांगगारुडी समाजाच्या सभागृहाचे भूमिपूजन

## गोरख काळे यांच्या प्रयत्नाला यश

बीड । प्रतिनिधी

शहरातील बार्शी नाका परिसरात इमामपूर रोड लगत मांग गारुडी समाजाच्या सभागृहाचे भूमिपूजन सारिका ताई क्षीरसागर यांच्या हस्ते पार पडले. या सभागृहासाठी गत पाच वर्षापासून गोरख काळे यांनी पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नाला यश आले आहे.

बार्शी नाका परिसरामध्ये इमामपूर रोड लगत मांग गारुडी समाजाची वस्ती आहे. या वस्तीचा विस्तार झाला असून विविध कार्यक्रमासाठी या समाजाला सभागृहाची आवश्यकता होती परंतु सभागृह होत नव्हते यामुळे या समाजातील लोकांना छोटया मोठ्या कार्यक्रमासाठी अडचणीचा सामना करावा लागत असे हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मांग गारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे यांनी लक्ष घालून गत पाच



वर्षापासून पाठपुरावा करत अखेर प्रश्न मार्गी लावला आहे. या कामी युवक नेते योगेश क्षीरसागर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यामुळे समाजाचा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागला असून या सभागृहाचे भूमिपूजन सारिका ताई क्षीरसागर यांच्या हस्ते नुकतेच पार पडले आहे या कार्यक्रमाला शिवाजी अंकुशे, प्रभू हातागळे, मेघराज काळे, धनंजय काळे,राजेंद्र कुसळकर, मतीन भाई, शाहदेव वंजारे, ज्ञानेश्वर राऊत, रजनीकांत वीर, बाळू काळे, दिनेश चौगुले, बारीक रोकडेसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान भूमिपूजन नंतर या सभागृहाचे बांधकाम चालू झाले असून नागरिकांत समाधान व्यक्त केले जात आहे.

# च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वीजजोडणीसाठी जलसमाधीआंदोलन संपन्न

## प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधांचा अभाव :- डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील च-हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र ८ वर्षांपूर्वी ५ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आले असुन सुरूवातीपासूनच वीज जोडणी अभावी प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत शोभेची वस्तू बनली असुन वारंवार आंदोलनानंतर वीज जोडणीसाठी मंजुर झालेला १६ लाख रुपयांचा निधी जिल्हा परिषद बांधकाम विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि जिल्हा आरोग्य अधिकारी बीड यांच्या हलगर्जीपणामुळे २ वेळा अखर्चित राहीलेला असुन काम न केल्याने निधी पडुन आहे.त्यामुळे संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी आणि प्राथमिक आरोग्य केंद्राला तातडीने वीज जोडणी करावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता




महासंघ डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१४ सोमवार रोजी सकाळी ११ वाजता च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील काकदरा साठवण तलावात जलसमाधी आंदोलन करण्यात येऊन लेखी आश्वासनानंतर आंदोलन तुर्तास मागे घेण्यात आले. यावेळी आंदोलनात प्रांताध्यक्ष शिवशक्ती,भिमशक्ति विचारमंच, शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, बप्पासाहेब पवार, मनोज तांदळे ग्रामपंचायत सदस्य, सुभाष बांगर,संपत नागरगोजे , सुर्यकांत नागरगोजे, हरिश्चंद्र जाधव, भगिरथ उबाळे आदि ग्रामस्थ सहभागी झाले होते. निवेदन देशमाने, शाखा अभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद बीड , डॉ.सचिन शेकडे जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी जिल्हा परिषद बीड, तलाठी एम.एस.खांदे पोलिस उपनिरीक्षक कुकलारे एस आर व पोलीस कर्मचारी यांच्या मार्फत जिल्हाधिकारी ,जिल्हा आरोग्य अधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना देण्यात आले आहे.

बीड तालुक्यातील च-हाटा येथे ८ वर्षांपूर्वी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ५ कोटी रुपये खर्चून प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत आणि अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधण्यात आली. पंचक्रोशीतील ग्रामस्थांना चांगल्या सुविधा मिळाव्यात.बीडला जाण्याचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागु नये हा उद्देश होता.मात्र ईमारतीचे बांधकाम झाल्यानंतर ईमारत आणि अधिकारी कर्मचारी निवासस्थाने यांना वीजजोडणी करण्यात आलीच नाही.त्यामुळे अधिकारी आणि कर्मचारी मुख्यालयी रहात नसल्याने रूग्णांना उपचारासाठी बीडला जावे लागते.वीजजोडणी अभावी प्रसूती, शस्त्रक्रिया,आंतररुग्ण विभाग या आरोग्य सुविधा मिळत नाहीत.

च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राला वीज जोडणीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा यासाठी डॉ.गणेश ढवळे,शेख युनुस,सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार यांनी च-हाटा येथे रास्ता रोको आंदोलन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २ वेळा धरणे आंदोलने केल्यानंतर जिल्हा आरोग्य अधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत च-हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी विद्युत रोहित्र बसविणे व ईतर संलग्न कामासाठी १६ लाख रुपयांचा निधी वर्ग करण्यात आलेला होता.परंतु अद्याप बांधकाम विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याने अद्याप वीज जोडणी करण्यात आलेली नाही. च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्रातील वीज जोडणी अभावी आरोग्य केंद्रातील असुविधांचे एकंदरीतच जिल्हा आरोग्य विभाग आणि बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना यांचे गांभीर्य दिसून येत नाही.

# ध्येय निश्चिती, जिद्द, अभ्यासातील सातत्य व पालकांच्या कष्टाची जाण ठेवून यश मिळवता येते-प्रा. डॉ. शिवाजीराव दिवाण

बीड । प्रतिनिधी

उच्च शिक्षण मिळवण्याकरता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले तरी आपले ध्येय गाठण्याकरता त्यांनी १८ - १८ तास अभ्यास करून आपली ध्येय गाठले. डॉ. बाबासाहेबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांना ध्येयनिश्चिती, जिद्द व अभ्यासातील सातत्य व पालकांच्या कष्टाची जाण ठेवून यश नक्की मिळेल असे प्रतिपादन प्रा. डॉ. शिवाजीराव दिवान यांनी विद्यार्थ्यांना संबोधताना केले.

दिनांक : ६ - १२ - २०२३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करून मिळालेल्या दानातील शालेय साहित्य गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना महामानव अभिवादन ग्रुप तर्फे आम्रपाली बुद्ध विहार व जय भीम नगर बुद्ध विहार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर (पूरग्रस्त कॉलनी) येथे ६८ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या पूर्वसंध्येला आयोजित कार्यक्रमात



सेवानिवृत्त सीईओ बनसोडे साहेब व प्रमुख पाहुणे डॉ. प्रा. दिवाण यांच्या हस्ते १३१ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम. राऊत यांनी केले तर प्रास्ताविक डी.जी. वानखेडे यांनी करून महामानव अभिवादन ग्रुप समाज उपयोगी राबवीत असलेल्या विविध उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली. आतापर्यंत शालेय साहित्य वाटपाच्या दहा फे-या पूर्ण करून ५०१ विद्यार्थ्यांना वाटप केले आहे. संविधान दिन २६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत ३०० विद्यार्थ्यांना प्राप्त केलेले शालेय साहित्य वाटप करण्याचे नियोजन केलेले आहे.

प्रा. डॉ. दिवाण पुढे म्हणाले की, सध्या स्पर्धेचे युग आहे. स्पर्धेत टिकावयाचे असेल तर उच्च शिक्षणाशिवाय पर्याय नाही. वाटेल ते कष्ट करावयास लागले तरी आपली गरिबी शिक्षणाच्या आड येऊ देऊ नका असा बहुमोल उपदेश केला. कार्यक्रमास सेवा निवृत्त प्रबंधक एलआयसी यू.एस. वाघमारे, महामानव ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, सेनि. शिक्षक आर. डी. चक्रे, दादाहरी गायकवाड, वडमारे इंदुबाई, भानुदास कांडेकर, मालन कोरडे, बबीता कोरडे, सोनाली कोरडे, रेखा वीर, रमा जोगदंड, सीमा चांदणे, डॉ. समृद्धी दिवाण, अमोल हिरवे व परिसरातील बहुसंख्य पालकांची व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बप्पा जावळे यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करिता योगेश शिंदे, प्रेरणा गायकवाड, अतुल कोरडे, आयुष जाधव यांनी बहुमोल परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात येऊन सरणयतयाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आझाद क्रांती सेनेच्या वडवणी तालुका प्रमुखपदी महादेव आवाड यांची निवड

माजलगाव (प्रतिनिधी)

आज दि.१०-१०-२०२४ रोजी वडवणी येथे आझाद क्रांती सेनेच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.हि बैठक आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.या बैठकीमध्ये आझाद क्रांती सेनेच्या वडवणी तालुका प्रमुख म्हणून चळवळीतील अनुभवी महादेव आवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.सर्व बहुजनांना सोबत घेऊन तालुक्यातील शेतकरी,शोषीत,पिडीत,कष्टकरी,शेतमजुर, कामगार, विद्यार्थी,कलाकार,यांचे प्रश्न शासन दरबारी मांडुन न्याय देण्याचा प्रयत्न आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातुन करणार आसल्याचे यावेळी महादेव आवाड यांनी सांगीतले.यावेळी आझाद क्रांती सेनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष महादेव आवाड यांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे, माजी सरपंच सुभाष साळवे, माजी सरपंच आरुण



आवाड,ड सचिन आवचर, भालेराव मित्र मंडळाचे जिल्हा अध्यक्ष बाबासाहेब साळवे, लक्ष्मण आवाड, उसतोड कामगार सनेचे ता प्रमुख सतीश हाणवते,धारुर ता प्रमुख बळीराम मस्के,उद्योजक केरबा कसबे, लक्ष्मण पाटोळे,आकाश हाणवते,वामण निवे, श्रीराम हाणवते, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ तांबडे,धारुर उपाध्यक्ष चंद्रसेन मस्के,कैलास गायकवाड़ राहूल गायकवाड़,पांडूदादा नानवर,करण मस्के, बाबासाहेब पाटोळे, यांच्या सह तालुक्यातील चाहत्यांनी महादेव आवाड यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

अध्यक्ष पदाला गालबोट लागु देणार नाही आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांनी माझ्यावर वडवणी ता प्रमुख पदाची जी जबाबदारी सोपवण्यात आली त्या पदाला गालबोट लागु देणार नाही आशी ग्वाही नवनिर्वाचित अध्यक्ष महादेव आवाड यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली.



पूर्वेशजी प्रताप सरनाईक युवासेना कार्याध्यक्ष आणि किरणजी साळी युवासेना सचिव यांचे काल बीडमध्ये आगमन झाले असता शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या वतीने माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर जगताप यांच्यासह बीड शिवसेना महिला आघाडी, युवासेना आजी-माजी पदाधिकारी-लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक यांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यलयात पुष्पगुच्छ देऊन स्वागत सत्कार केला.

# आने वाले हर बडे तुफान के संकेत पहले परिंदो को ही मिलते है. माहोल तो बेशक तुफान से ही बदलने वाला है

## बीड शहर बचाव मंचाचे नितीन जायभाये यांचे प्रस्थापितांना सडेतोड उत्तर

बीड । प्रतिनिधी

क्षीरसागर घराण्याने कायम मुस्लिम समाजाचा विश्वासघातच केला आहे. क्षीरसागर घराणे कायम मुस्लिम समाजाच्या हक्कांच्या बोकांडीच बसत आलेले आहे. व मुस्लिम समाजाचा जीवच घेत आलेले आहे. याचे इतिहासात अनेक पुरावे आहेत. मुस्लिम समाजाला कायम ताटाखालचे पाळलेले मांजर बनवून ठेवण्याचा प्रयत्न क्षीरसागर घराण्यातील लोकांनी आजवर केला आहे. मुस्लिम समाज वंचित आहे, शोषित आहे, मजबूर आहे, गरीबीत आहे. कोणी केलं आहे आजवर या मुस्लिम समाजाचे शोषण ? का गरीब आहे मुस्लिम समाज ? का वाईट आणि दयनीय परिस्थिती आहे मुस्लिम मोहल्यांची ? का पसरलेली आहे मुस्लिम समाजामध्ये प्रचंड बेरोजगारी ? कोणी केलं आजवर मुस्लिम समाजाच नेतृत्व ? आजवर कोणावर विश्वास ठेवत आलेला होता मुस्लिम समाज ? काय केलं तुम्ही गेल्या ४० वर्षात या मुस्लिम समाजासाठी. ? १९९९-२००० च्या झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये नव्याने उदयाला आलेल्या राष्ट्रवादी पक्षाचे निवडून आलेले एकमेव मुस्लिम आमदार सय्यद सलीम यांना पहिल्या यादीतच कॅबिनेट मिनिस्टर पद मिळाले होते. परंतु क्षीरसागरांच्या राज्यमंत्रीपदाच्या मोबदल्यात आमदार सय्यद सलीम यांनी त्या पदावर पाणी सोडले. त्या काळात क्षीरसागरांची बीडमध्ये निवडणूक लढवायची हिम्मतही नव्हती. म्हणून आमदार सय्यद सलीम यांना निवडणूक लढवावी लागली आणि त्यांनी ती जिंकूनही दाखवली. परंतु क्षीरसागरांनी त्यांचे कॅबिनेट मंत्रीपद हिरावून घेतले. पण सय्यद सलीम यांनी इमान आणि निष्ठेचे मोठे उदाहरण साकारून दाखवले. क्षीरसागर कुटुंब नेहमी मुस्लिम समाजाच्या हक्कांच्या बोकांडीच बसत आलेले आहे. मुस्लिम समाजाला कधीही नेतृत्व करण्याची संधी त्यांनी दिली नाही हेच सत्य आहे. आणि हीच त्यांची बरबटलेली कारकीर्द आहे.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT